Exh. 1

## अहमदनगर येथिल मे. चिफ ज्युडीशियल मॅजिस्ट्रेट साहेब यांचे कोर्टात...

**क्रि.केस. नं. /२०२४**

SCC 235/2025

**फिर्यादी**

**प्रगत शेतकरी केंद्र चे भागीदार**

**श्री. महेश पोपटलाल बोरा,**

वय - ४२ वर्षे, धंदा - व्यवसाय,

रा. प्लॉट नं. ९५, मार्केटयार्ड,

अहमदनगर

मो.नं. ९०२८३०६७७०

विरुध्द

**आरोपी**

**श्री. रमणलाल धनराज गांधी**

**प्रोप्रा- श्री. रमणलाल धनराज गांधी**

वय - ५० वर्षे, धंदा - व्यवसाय,

रा. मु.पो. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर,

जि. अहमदनगर

मो.नं. ९४२१४७८२६१

| | | | |
|---|---|---|---|
| १) | चेक देणा-याचे नाव | - | श्री. रमणलाल धनराज गांधी |
| २) | चेकची रक्कम | - | ७७,१३६/- रुपये |
| ३) | चेक नंबर व दिनांक | - | नं. ०१६४७०, दि. **१८/११/२०२४** |
| ४) | बँकेचे नाव | - | श्री स्वामी समर्थ सहकारी बँक लि. निघोज, शाखा - टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर, जि. अहमदनगर |
| ५) | चेक भरल्याचा दिनांक | - | १८/११/२०२४ |

| | | |
|---|---|---|
| ६) | चेक परत आल्याचा दिनांक - व कारण | १९/११/२०२४<br>फंडस् इनसफिशियंट<br>(Funds Insufficient) |
| ७) | नोटिस पाठविल्याचा दिनांक - | ०२/१२/२०२४ |
| ८) | आरोपीला नोटीस मिळाल्याचा दिनांक - | ०३/१२/२०२४ |
| ९) | गुन्हा घडल्याचे कारण - व दिनांक | चेक न वटता परत आल्याबद्दलची नोटीस ही आरोपी यास दि. ०३/१२/२०२४ रोजी मिळाली तरीही चेकपोटी असलेली रक्कम मुदतीत आणुन दिली नाही. |
| १०) | कोणत्या पोलिस स्टेशनच्या - हद्दित आहे ते ठिकाण | कोतवाली पोलीस स्टेशन, अहमदनगर |

**<u>फिर्याद - निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ प्रमाणे</u>** :

**<u>याकामी फिर्यादी कळवितो ते येणे प्रमाणे की,</u>**

१) फिर्यादी यांची प्लॉट नं. ९५ मार्केटयार्ड, अहमदनगर येथे प्रगत शेतकरी केंद्र या नावाची भागीदारी फर्म आहे. सदरचे फर्म मधून फिर्यादी शेतीसाठी लागणारे बियाणे व किटकनाशकेची विक्री करतात. सदर फर्मचे व इतर भागीदार यांचे वतीने महेश पोपटलाल बोरा यांना नोटीसा देणे, फिर्याद दाखल करणे, केसेस चालविणे इत्यादी अधिकार दिलेले आहेत.

२) आरोपीची **रमणलाल धनराज गांधी** या नावाने मु.पो. टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर, जि. अहमदनगर येथे दुकान असून आरोपी हे सदरचे दुकानामधून

शेतीसाठी लागणारे बियाणे व किटकनाशके विक्री करणेचा व्यवसाय करतात व आरोपीचे दुकानाकरीता लागणारे बियाणे व किटकनाशके आरोपी हे फिर्यादीचे फर्ममधुन खरेदी करीत असत त्यामुळे आरोपीचा व फिर्यादीचा परिचय झाला, ओळख वाढली, दरम्यान आरोपीने फिर्यादी यांना त्यांचे फर्म मध्ये उधारीचे खाते ठेवणेची विनंती केली व त्यांचे फर्म मध्ये उधारीचे खाते ठेवणेची विनंती केली व खाते बाकी पोटी होणारी रक्कम वेळोवेळी देणेचा भरवसा व खात्री दिली. आरोपीशी असलेला परिचय व ओळख लक्षात खात्री दिली. आरोपीशी असलेला परिचय व ओळख लक्षात घेऊन फिर्यादी यांनी आरोपीवर विश्वास ठेवुन त्यांचे फर्म मध्ये आरोपीचे दुकानचे नावे उधारीचे खाते ठेवले व आरोपीने वेळोवेळी सदरचे खात्यावर बियाणे व किटकनाशके उधारीने नेलेले आहे.

३) अशा प्रकारे फिर्यादी व आरोपीचे दरम्यान आर्थिक व्यवहार चालू असताना फिर्यादी यांनी आरोपीकडे खाते बाकीपोटी असलेल्या रकमेची मागणी केली असता आरोपीने दि. १८/११/२०२४ रोजीचा श्री स्वामी समर्थ सहकारी बँक लि. निघोज, शाखा - टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर, जि. अहमदनगर या बँकेचा चेक क्र. ०१६४७० या क्रमांकाचा रक्कम रु. ७७,१३६/- या रकमेचा दिला व सदरचा चेक बँकेत भरलेस चेक पोटी असलेली रक्कम मिळेल असा भरवसा व खात्री दिली.

४) सदरचा चेक फिर्यादी यांनी त्यांचे खाते असलेल्या बँकेत म्हणजेच अहमदनगर मर्चंट को.ऑप. बँक लि. अहमदनगर शाखा मार्केटयार्ड, अहमदनगर येथे दि. १८/११/२०२४ रोजी भरला असता सदरचा चेक फंडस् इनसफिशियन्ट असा शेरा मारुन दि. १९/११/२०२४ रोजी फिर्यादीचे खातेमध्ये परत आला

तसे फिर्यादी यांना बँकेने मेमोसहीत पत्र दिलेले आहे. म्हणजेच चेक पोटी असलेली रक्कम आरोपीचे खात्यामध्ये शिल्लक नाही हे माहित असून देखील आरोपीने वरील रकमेचा चेक दिला व फिर्यादीची फसवणूक केलेली आहे. वास्तविक चेक भरलेनंतर फिर्यादी यांना चेक पोटी असलेली रक्कम मिळावयास पाहिजे होती, परंतू ती मिळाली नाही.

५) त्यानंतर फिर्यादीने आरोपी यांना दिनांक **०२/१२/२०२४** रोजी वकिलामार्फत रजि. पोष्टाने नोटीस पाठविली व चेक पोटी असलेल्या रक्कमेची मागणी केली. सदरची नोटीस आरोपीस दिनांक **०३/१२/२०२४** रोजी मिळाली. परंतु तरीही आरोपीने फिर्यादीस चेकपोटी असलेली रक्कम आणुन दिली नाही. त्यामुळे फिर्यादीची फसवणुक झालेली आहे. म्हणून आरोपीने निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ प्रमाणे गुन्हा केलेला आहे. म्हणून आरोपी विरुद्ध फिर्यादीने सदरची फिर्याद दाखल केलेली आहे. सदर फिर्यादीची चौकशी होऊन आरोपींना निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ प्रमाणे कडक शासन व्हावे हि विनंती.

**या कामी फिर्यादीचा साक्षीपुरावा खालील प्रमाणे** :-

**१) मा. शाखाधिकारी,**

श्री स्वामी समर्थ सहकारी बँक लि. निघोज, शाखा - टाकळी ढोकेश्वर, ता. पारनेर, जि. अहमदनगर

माहितगार इसमास साक्षीस पाठवावे व साक्षीस येताना आपले खातेदार **श्री. रमणलाल धनराज गांधी प्रोप्रा- श्री. रमणलाल धनराज गांधी** यांचा चेक

क्र. ०१६४७० आपण **दिनांक १९/११/२०२४** रोजी डिसऑनर झाले त्याबाबत सर्व कागदपत्रे, खाते उतारे वगैरे घेऊन यावेत.

२) **मा. शाखाधिकारी**

**अहमदनगर मर्चंटस् को.ऑप. बँक लि. शाखा - मार्केटयार्ड, अहमदनगर**

माहितगार इसमास साक्षीस पाठवावे व साक्षीस येताना आपले खातेदार **प्रगत शेतकरी केंद्र चे भागीदार श्री. महेश पोपटलाल बोरा,** यांना चेक क्र.०१६४७० आपण **दि.१९/११/२०२४** रोजी डिसऑनर झालेबाबत पत्र दिले आहे त्यासंबंधी सर्व कागदपत्रे व खाते उतारे घेऊन यावेत. जरुर पडलेस यापेक्षा जादा साक्षीपुरावा देण्याची फिर्यादीस परवानगी असावी.

येणेप्रमाणे फिर्यादीची फिर्याद असे.

दिनांक : १/१२/२०२४
ठिकाण - अहमदनगर

**फिर्यादी**